**जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणा-या पत्रकारांना पुरस्कार देणेबाबत .**

# महाराष्ट्र शासन

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**

**शासन निर्णय क्र. मफुअ-२०१३ /प्र. क्र. ३७ /जल-८**

मंत्रालय , मुंबई -४०००३२

**दिनांक : २८ सप्टेंबर, २०१६**

वाचा :

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक

| | |
|---|---|
| (१) जलसं-२००२/प्र.क्र.५८१/जल-७, | दिनांक २८ फेब्रुवारी, २००२. |
| (२) जलसं-२००२/प्र.क्र६७०/जल-७, | दिनांक २९ नोव्हेंबर, २००२. |
| (३) जलसं-१००३/प्र.क्र .७९/जल-८, | दिनांक १८ जून, २००३. |
| (४) जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, | दिनांक १० सप्टेंबर, २००८. |
| (५) जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, | दिनांक २० फेब्रुवारी, २००९. |
| (६) जलसं-२०११/प्र.क्र.१६ /जल-८, | दिनांक ३० मार्च, २०११. |
| (७) जलसं-२०११/प्र.क्र.६५ /जल-८, | दिनांक ०३ फेब्रुवारी, २०११. |
| (८) शुध्दीपत्रक -२०११ / प्र.क्र.६५ / जल-८, | दिनांक ०७ मार्च, २०१२. |
| (९) मफुअ २०१३ / प्र.क्र. ३७ / जल-८, | दिनांक १६ डिसेंबर, २०१३. |
| (१०) मफुअ २०१४ / प्र.क्र. ५४ / जल-८, | दिनांक ११ ऑगस्ट, २०१४. |
| (११) जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ | दिनांक ५ डिसेंबर, २०१४. |

**प्रस्तावना :**

राज्यातील ग्रामीण भागातील जल व भूमी संधारण, पडीक जमीन विकास, वृक्ष लागवड इत्यादी नैसर्गिक साधन संपत्तीत सुधारणा व वाढ करण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेचा लोक सहभाग या माध्यमाद्वारे महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान दिनांक १ मे, २००२ पासून संदर्भाधीन दिनांक २८ फेब्रुवारी, २००२ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यास सुरूवात झाली. जलसंधारण कार्यक्रमाला गती देण्यासाठी अभियान काळात केलेल्या चांगल्या कार्याचा गौरव व्हावा या उद्देशाने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती व सेवाभावी संस्था यांना पुरस्कार देण्यासाठी संदर्भाधीन दिनांक १८ जून, २००३ च्या शासन निर्णयान्वये बक्षीस योजना जाहीर करण्यात आली आहे. तथापि, या योजनेस मिळालेल्या सौम्य प्रतिसादाने त्याचे संदर्भाधीन दिनांक १६ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये स्वरुप बदलून व्यापक / सुधारित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील टंचाईवर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाने दिनांक ०५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. सदर अभियानाच्या अनुषंगाने स्वत:च्या उत्कृष्ट लिखणाद्वारे वृत्तपत्रातून जलसंधारणाचे महत्व सर्व सामान्य जनतेपर्यत पोहचविणाऱ्या पत्रकारांस पुरस्कार देण्याचे निर्णय घेण्यात आला होता. त्यानुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूची व या अभियानांतर्गत लिखाणाद्वारे जलसंधारणाचे महत्व सर्वसामांन्य जनतेपर्यत पोहचविण्यात दिलेल्या योगदानाबद्दल पत्रकारांना पुरस्कार देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील पाण्याची उपलब्धता व वारंवार येणारी दुष्काळ सद्दश परिस्थिती विचारात घेता जलसंवर्धनाच्या कार्यक्रमास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्रातील जवळ जवळ ८० टक्के क्षेत्र कोरडवाहू असून पर्जन्याधारीत आहे. राज्यातील सिंचन क्षमतेस मर्यादा आल्याने विविध स्त्रोताद्वारे पाण्याचा पुरेपूर उपयोग केल्यास कमाल २८ टक्के क्षेत्र ओलीताखाली येऊ शकते. कोरडवाहू क्षेत्रावर अवलंबून असलेल्या जनतेस अनिश्चित व अपु-या पर्जन्यवृष्टीमूळे आर्थिक संकटास आणि पाणि टंचाईस सामोरे जावे लागत आहे. या साठी राज्यातील कोरडवाहू क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मृद व जलसंधारण कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाद्वारे

जमिनीची धूप थांबवणे, पाणलोटाच्या माथा ते पायथ्यामध्ये विविध उपचाराद्वारे अपधावेचे नियंत्रण करुन भूगर्भातील पाणी साठवणे, जमिनीचा पोत कायम राखून उत्पादनात वाढ करणे इत्यादी उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. राज्यातील टंचाईवर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाने दिनांक ०५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. सदर अभियानाच्या अनुषंगाने स्वत:च्या उत्कृष्ट लिखणाद्वारे वृत्तपत्रातून जलसंधारणाचे महत्व सर्व सामान्य जनतेपर्यत पोहचविणाऱ्या पत्रकारांस पुरस्कार देण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. या पुरस्काराचा कालावधी या आर्थिक वर्षापासून पुढील ०५ वर्षापर्यंत अर्थात सन २०१९-२० या कालावधी पर्यंत राहील.

२. पुरस्काराचे स्वरूप:

आपल्या लिखाणाद्वारे वृत्तपत्रातून जलसंधारणाचे महत्व सर्वसामान्य जनतेपर्यत पोहचविणारे पत्रकार आणि जलयुक्त शिवार अभियानाची त्या त्या परिसरातील जनजागृती, अभियानात लोकसहभाग वाढविणे, पाण्याचा ताळेबंद व कार्यक्षम वापर, पाणलोटाच्या यशोगाथा प्रकाशित करणे, इतर गावांना प्रोत्साहित करुन पाणी प्रश्न सोडविण्यात योगदान देणारे पत्रकार या पुरस्कारासाठी पात्र राहतील. याबाबत जिल्हास्तरावर विभाग / विभागीय स्तरावर व राज्य स्तरावर प्रत्येकी ३ पारितोषिके देण्यात यावी असे दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २१ मध्ये नमूद केले आहे.

राज्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर खालील नावाने पुरस्कार प्रदान करण्यात यावेत.

| स्तर | पुरस्काराचे नाव |
|---|---|
| **राज्यस्तर** | **महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार** |
| **विभागस्तर** | **राजमाता जिजाऊ जलमित्र पुरस्कार** |
| **जिल्हास्तर** | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलमित्र पुरस्कार** |

या पुरस्कारासाठी महाराष्ट्र राज्यात प्रकाशित होणाऱ्या मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील दैनिके, साप्ताहिके व पाक्षिकातील लिखाणाचा विचार केला जाईल. पुरस्कारासाठी पुढीलप्रमाणे गट असतील. **१) पत्रकार २) इलेक्ट्रॉनिक मीडिया.**

त्याअनुषंगाने **पत्रकारांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे :- (रक्कम व स्मृतीचिंन्ह सर्वांना देण्यात येईल)**

| स्तर | जिल्हा/ विभाग / राज्यस्तर | पुरस्काराची संख्या | एकूण पुरस्कार | बक्षिसाची रक्कम | एकूण रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| **जिल्हा स्तर** | ३४ जिल्हे | ०३ प्रती जिल्हा | १०२ | प्रथम क्र. रु.१५०००/- | रु.१२.५८ |
| | | | | द्वितीय क्र. रु. १२०००/- | |
| | | | | तृतीय क्र.रु.१००००/- | |
| **विभागीय स्तर** | ६ विभाग | ०३ प्रती विभाग | १८ | प्रथम क्र.रु.३००००/- | रु.३.९० |
| | | | | द्वितीय क्र.रु. २००००/- | |
| | | | | तृतीय क्र. रु.१५०००/- | |
| **राज्य स्तर** | | ०३ | ०३ | प्रथम क्र.रु.५००००/- | रु.१.१० |
| | | | | द्वितीय क्र.रु. ३५०००/- | |
| | | | | तृतीय क्र. रु.२५०००/- | |
| | | **एकूण** | १२३ | | रु. १७.५८ |

तसेच राज्यस्तरावर **इलेक्ट्रॉनिक मिडीया** मधील मराठी वृत्तकथा प्रसारित करणाऱ्यांना खालीलप्रमाणे रक्कम व स्मृतीचिंन्ह सर्वांना देण्यात येईल.

| **स्तर** | **जिल्हा/ विभाग / राज्यस्तर** | **पुरस्काराची संख्या** | **एकूण पुरस्कार** | **बक्षिसाची रक्कम** | **एकूण रक्कम (रु.लाखात)** |
|---|---|---|---|---|---|
| **राज्य स्तर** | | ०३ | ०३ | प्रथम क्र.रु.१०००००/- | रु.२.२२ |
| | | | | द्वितीय क्र.रु. ७१०००/- | |
| | | | | तृतीय क्र. रु.५१०००/- | |

उत्कृष्ट पत्रकारासाठी पुरस्कार निवडीचे स्वरुप, नियम, अटी, निकष, गुण व निवड समित्या या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. समितीची रचना, स्पर्धा व स्पर्धेतील पुरस्कारांसंबंधी निवड समितीचे / शासनाचे निर्णय अंतिम राहतील.

प्रवेशिका निवडीसंबंधी किंवा त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या अडचणी/समस्या इत्यादींसंबंधी निवडसमितीचा निर्णय अंतिम राहील. या बक्षीस योजने अंतर्गत वरील पुरस्कारासाठी करण्यात येणारा खर्च खालील लेखाशिर्षातर्गत मंजूर केलेल्या निधीतून खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

" मागणी क्र.एल- ३, २४०२-मृद संधारण (००)
१०२ मृद संधारण- (०४) मृद व जलसंधारण
(००) (००१) महात्मा ज्योतिबा फुले जल मित्र पुरस्कार (२४०२ १०३७) ०५, बक्षिसे "

सदर शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्रमांक : २०६/का.१४३४, दिनांक ५/९/१५ व क्र.६२३/व्यय-१५, दिनांक २०/१०/१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९२८१५३९४३९०२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shankar Trambak Jadhav

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=c83ebbb277c2e72c85231b87f684c424a13c398a4f921b6d167a8c859e9817f5, cn=Shankar Trambak Jadhav
Date: 2016.09.30 15:38:32 +05'30'

**(शं.त्र्यं.जाधव)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. विधानपरिषद / विधानसभा विरोधी पक्ष नेता यांचे खाजगी सचिव
४) सर्व मा. राज्यसभा / लोकसभा / विधानपरिषद / विधानसभा सदस्य
५) मा. मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्यमंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
७) कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे.
८) मुख्य सचिव यांचे सचिव,
९) सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,

१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१५) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण संस्था, पुणे,
१६) अपर मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पणलोत विकास यंत्रणा पुणे
१७) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे
१८) मुख्य अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे
१९) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२०) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
२१) कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
२२) कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी/कुलगुरु पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
२३) कुलगुरु, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,/सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२६) सर्व सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
२७) सर्व सहसंचालक, (सामाजिक वनीकरण ),
२८) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२९) सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे,(स्थानिक स्तर)
३०) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
३१) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
३२) सर्व सहसंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते,
३३) सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व उपवनसंरक्षक,
३४) सर्व उपसंचालक,सामाजिक वनीकरण.
३५) सर्व उपायुक्त (विकास),
३६) सर्व उपायुक्त (रोहयो),
३७) सर्व उपसंचालक, माहिती व जनसंपर्क विभागीय कार्यालये
३८) सर्व जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी
३९) सर्व जिल्हा अध्यक्ष,जिल्हा पत्रकार परिषद
४०) अध्यक्ष, मंत्रालय व विधीमंडळ वार्ताहर संघ
४१) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४२) महालेखापाल -१/२, महाराष्ट्र राज्य ,मुंबई / नागपूर . (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
४३) अप्पर संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कक्ष,
४४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४५) निवासी लेखापरीक्षा, अधिकारी, मुंबई.
४६) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
४७) नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई
४८) सर्व उपसचिव / अवर सचिव/कक्ष अधिकारी,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
४९) जल-८ (निवडनस्ती) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई .

## शासन निर्णय क्रमांक मफुअ-२०१५/प्र.क्र.३७/जल-८ दि. २८/०९/२०१६

### परिशिष्ट "अ"

जलयुक्त शिवार अभियानात वृत्तपत्रातून जलसंधारणाचे महत्व सर्वसामान्य जनतेपर्यत पोहचविणारे पत्रकार आणि जलयुक्त शिवार अभियानाची त्या त्या परिसरातील जनजागृती, अभियानात लोकसहभाग वाढविणे, पाण्याचा ताळेबंद व कार्यक्षम वापर, पाणलोटाच्या यशोगाथा प्रकाशित करणे, इतर गावांना प्रोत्साहित करुन पाणी प्रश्न सोडविण्यात योगदान देणारे पत्रकार या पुरस्कारासाठी पात्र राहतील. उत्कृष्ट पत्रकारांसाठी पुरस्कार निवडीचे स्वरुप, नियम, अटी व समिती पुढीलप्रमाणे राहील. समितीची रचना, स्पर्धा व स्पर्धेतील पुरस्कारांसंबंधी निवड समितीचे / शासनाचे निर्णय अंतिम राहतील. निवड समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

**३. निवड समिती : (राज्यस्तर)**

| | |
|---|---|
| १. मा.मंत्री (जलसंधारण) | - अध्यक्ष |
| २. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) | - उपाध्यक्ष |
| ३. सचिव (जलसंधारण) | - सदस्य |
| ४. उपसचिव (जलसंधारण) | - सदस्य |
| ५. मुख्य अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) | - सदस्य |
| ६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | - सदस्य |
| ७. मराठी पत्रकार परिषदेचा प्रतिनिधी | - सदस्य |
| ८. अध्यक्ष, मंत्रालय व विधीमंडळ वार्ताहर संघ | - सदस्य |
| ९. राज्यातील सर्वाधिक खपाच्या मराठी, हिंदी व इंग्रजी वृत्तपत्राचे प्रत्येकी एक संपादक | - तीन सदस्य |
| १०. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन | - सदस्य सचिव |

**विभागस्तर समिती**

| | |
|---|---|
| १. विभागीय आयुक्त | - अध्यक्ष |
| २. उपायुक्त (रोहयो) | - सदस्य |
| ३. अधीक्षक अभियंता (जलसंधारण) | - सदस्य |
| ४. विभागीय कृषी सह संचालक | - सदस्य |
| ५. विभागातील सर्वाधिक खपाच्या दोन दैनिकांचे संपादक | - सदस्य |
| ६. उप संचालक माहिती व जनसंपर्क | - सदस्य सचिव |

**जिल्हास्तर समिती**

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | - सदस्य |
| ३. कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, जलसंधारण | - सदस्य |
| ४. अध्यक्ष जिल्हा पत्रकार संघ | - सदस्य |
| ५. जिल्हयातील सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्राचे संपादक | - सदस्य |
| ६. जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी | - सदस्य सचिव |

**२. पत्रकार पुरस्कार पात्रतेसाठीच्या अटी :-**

१) जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रसिध्दीसाठी, बातमीदारांनी मोहिमेच्या अंमलबजावणीच्या प्रथम वर्षी, दिनांक १ जानेवारी, २०१५ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ आणि त्यापुढे प्रतिवर्षी १ जानेवारी ते पुढील वर्षातील ३१ डिसेंबर या कालावधीत प्रसिध्द केलेले साहित्य पुरस्कार पात्रतेकरिता मूल्यमापनार्थ ग्राहय धरण्यात येईल.

२) पुरस्कारांसाठी उक्त कालावधीत वृत्तपत्रे / नियतकालीके यामधून प्रसिध्द झालेले टीकात्मक लेख, वृत्तांकन, बातम्या, अग्रलेख, फोटोफिचर्स, अशा साहित्याचा विचार करण्यात येईल.

३) पुरस्कारासाठी वृत्तपत्रांचे बातमीदार, स्तंभलेखक, मुक्तपत्रकार पात्र असतील.

४) पारितोषिकांसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत प्रसिध्द केलेल्या साहित्याचा विचार करण्यात येईल.

५) उमेदवारास ज्या स्तरावरील पारितोषिकासाठी अर्ज करावयाचा आहे त्या स्तरावरील समितीच्या सदस्य सचिवाकडे अर्ज करता येईल. मात्र कोणत्याही एका पारितोषिकासाठीच अर्ज करता येईल.

६) पारितोषिकासाठी विहित मुदतीत वैयक्तिक केलेले अर्ज विचारात घेण्यात येतील. एका वर्तमानपत्राच्या प्रत्येक आवृत्तीच्या एकाच पत्रकाराचा अर्ज संपादकामार्फत स्विकारण्यात येईल. जर एका वर्तमानपत्राच्या एका आवृत्तीतील एकापेक्षा जास्त पत्रकार स्पर्धेत सहभागी होऊ इच्छित असतील तर, त्यांनी केलेल्या अर्जापैकी एकाच पत्रकाराच्या साहित्याची निवड करुन संबंधित संपादक संबंधित समितीकडे पाठवितील. वृत्तपत्र बातमीदाराचे साहित्य अनेक वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेले असेल तर त्यासंबंधीचा एकत्रित अर्ज त्या संपादकापैकी कोणतेही एक संपादक संबंधित समितीकडे पाठवितील.

७) जिल्हास्तरीय पारितोषिकासाठी संबंधित जिल्हयातून प्रसिध्द होणारी वृत्तपत्रे / नियतकालिके यामधून प्रसिध्द झालेले साहित्य विचारात घेण्यात येईल. सदर वृत्तपत्रे / नियतकालिके यांच्या प्रत्येक आवृत्तीच्या एकाच पत्रकारास संबंधित आवृत्तीत प्रसिध्द झालेल्या साहित्यासंदर्भात अर्ज करता येईल.

८) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या अ,ब,क वर्गवारीतील वृत्तपत्रे / नियतकालिके यामधून प्रसिध्द झालेल्या साहित्याचाच वरील पारितोषिकांसाठी विचार करण्यात येईल.

९) पुरस्कारासाठी गठित निवड समित्यातील सदस्य या स्पर्धेत सहभागी होवू शकणार नाहीत

१०) पुरस्कारांसाठी पत्रकारांची मागील पाच वर्षांची कामगिरी, त्यांची सामाजिक बांधिलकी, शासनाच्या विकास विषयक जाणिवांच्या जागृतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि पुरस्कार देण्यात येणाऱ्या वर्षातील त्यांची कामगिरी याचा विचार केला जाईल. तसेच सलग दोन वर्ष एकाच पत्रकाराला पुरस्कार प्राप्त झाल्यास तिसऱ्या वर्षी त्यांची प्रवेशिका विचारात घेतली जाणार नाही.

११) पुरस्कारासाठी पाठवावयाच्या प्रवेशिकेसोबत मूळ लिखाणाची कात्रणे त्याच्या दोन प्रतींसह पाठवावी लागतील. मूळ लिखाणाच्या वृत्तपत्रीय कात्रणांसोबत त्याच्या दोन प्रती नसल्यास प्रवेशिका रद्द होईल. मूळ लिखाणावर लेखकाचे

नाव नसल्यास, ज्या नियतकालिकात हा लेख प्रसिध्द झाला असेल त्या नियतकालिकाच्या संपादकांचा दाखला प्रवेशिकेबरोबर जोडलेला असावा, अन्यथा त्या प्रवेशिकेचा विचार केला जाणार नाही. ज्या नियतकालिकांचा खप व जनमानसावरील प्रभाव चांगला आहे, अशाच नियतकालिकांतील मजकूर स्पर्धेच्या प्रवेशिकेसाठी पात्र ठरेल. ज्या कॅलेंडर वर्षाकरिता प्रवेशिका असेल त्या कॅलेंडर वर्षातील दैनिक वृत्तपत्रात / नियतकालिकात प्रसिध्द झालेल्या लेखांची कात्रणे प्रवेशिकेसोबत जोडणे आवश्यक राहील. स्पर्धेसाठी पाठविलेली प्रवेशिका, त्यासोबत जोडलेली लेखांची कात्रणे नीटनेटकी असणे आवश्यक राहील. अस्ताव्यस्त, खाडाखोड असणारी किंवा वाचता येणार नाहीत अशा प्रवेशिका रद्द समजण्यात येतील. प्रत्येक स्तरावरील पुरस्कारासाठी एकापेक्षा अधिक प्रवेशिका पाठविल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.

१२) स्पर्धेत भाग घेणाऱ्या पत्रकार स्पर्धकांनी शासन अथवा शासकीय महामंडळाच्या सेवेत नसल्याचे प्रतिज्ञापत्र प्रवेशिकेसोबत जोडणे आवश्यक आहे. प्रवेशिकेसोबत जिल्हा माहिती अधिकारी किंवा पत्रकार संघटनांच्या शिफारसपत्राची आवश्यकता नाही.

१३) प्रत्येक जिल्हयातून प्रथम क्रमांक मिळविलेल्या पत्रकारांचे विभागीय स्तरावरील पारितोषिकांसाठी आपोआप नामनिर्देशन होईल.

१४) प्रत्येक विभागातून प्रथम क्रमांक मिळविलेल्या पत्रकारांचे राज्य स्तरावरील पारितोषिकांसाठी आपोआप नामनिर्देशन होईल.

**१५) अर्जदारांनी परिशिष्ट-ब येथे विहित नमुन्यातील आपला अर्ज <u>तीन प्रतीत</u> संबंधित जिल्हास्तर, विभागीय स्तर व राज्यस्तर समित्यांकडे दरवर्षी दिनांक ३० ऑक्टोबर, पुर्वी पोहचेल असा पाठवावा. दिनांक ३० ऑक्टोबर, नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

१६) जिल्हास्तरीय समिती प्राप्त अर्जासोबतच्या साहित्याचे पुढील अनुक्रमांक-३ मधील निर्धारित निकष व द्यावयाचे गुण यानुसार परीक्षण करुन प्रथम, द्वितीय, व तृतीय येणाऱ्या उमेदवारांची नावे **दिनांक ३० नोव्हेंबर** रोजी प्रथम पुरस्कार प्राप्त उमेदवाराच्या साहित्यांसह संबंधित विभागीयस्तर समितीकडे गोपनीयरित्या पाठविल. तसेच आपला निकाल समितीमार्फत गोपनीयरित्या शासनास सादर करील.

१७) विभागीयस्तरीय समिती प्राप्त अर्जासोबतच्या साहित्याचे पुढील अनुक्रमांक-३ मधील निर्धारित निकष व द्यावयाचे गुण यानुसार परिक्षण करून प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ येणाऱ्या उमेदवारांची नावे **दि.३० डिसेंबर** रोजी प्रथम पुरस्कारप्राप्त उमेदवाराच्या साहित्यासह नामनिर्देशनासाठी राज्यस्तरीय समितीकडे पाठवील.

१८) राज्यस्तर समिती प्राप्त अर्जासोबतच्या साहित्याचे पुढील अनुक्रमांक-३ मधील निर्धारित निकष व द्यावयाचे गुण यानुसार परिक्षण करून प्रथम, व्दितीय, तृतीय येणाऱ्या उमेदवारांची नावे **दि.३१ जानेवारी** रोजी घोषित करेल.

१९) जिल्हास्तर व विभागस्तरावरील प्रथम पारितोषिकासाठी पात्र ज्या उमेदवारांची नावे अनुक्रमे विभाग व राज्यस्तरावर पाठविण्यात आलेली होती त्यास्तरावर ती बक्षिसासाठी पात्र न ठरल्यास त्यांची यथास्थिती जिल्हास्तर व विभागस्तरावरील निवड अबाधित राहिल. एका पत्रकारास जिल्हा विभाग व राज्यस्तरावरील एकच सर्वोच्य पुरस्कार व पुरस्कार रक्कम देण्यात येईल.

२०) राज्यस्तरीय समिती जिल्हास्तर व विभागस्तरावरील प्रथम, व्दितीय, तृतीय पुरस्कार प्राप्त उमेदवारांची नावे दिनांक ३१ जानेवारी रोजी घोषित करील.

## ३) निकष व द्यावयाचे गुण (पत्रकार)

| अ.क्र. | तपशील | कमाल गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| | १) संख्यात्मक | | |
| १.१ | संबंधित अर्जदाराने अभियान कालावधी (दिनांक १ जानेवारी ते३१ डिसेंबर) एकुण प्रसिध्द केलेल्या बातम्या/ फोटो फिचर्स यांची संख्या | १५ | |
| १.२ | एकूण प्रसिध्द केलेल्या लेख/अग्रलेख/लेखमालांची संख्या | २५ | |
| | एकूण | ४० | |
| | सदर लेख / बातमी ज्यात प्रसिध्द झाली आहे त्या एकूण दैनिक / नियतकालिकांची अ,ब,क वर्गवारीनिहाय संख्या---- | | |
| | अ) जर सदर साहित्य अ वर्गवारीतील दैनिक / नियतकालिकात प्रसिध्द झाले असेल तर त्याला मिळालेल्या एकूण गुणांच्या १० टक्के जादा गुण (Weightage Marks) एकूण गुणात मिळविण्यात येतील. | एकूण गुणाच्या १०% जादा गुण | |
| | ब) जर सदर साहित्य अ वर्गवारीतील दैनिक / नियतकालिकात प्रसिध्द झाले असेल तर त्याला मिळालेल्या एकूण गुणांच्या १० टक्के जादा गुण (Weightage Marks) एकूण गुणात मिळविण्यात येतील. | एकूण गुणाच्या १०% जादा गुण | |
| | एकुण | ४० + जादा गुण | |
| | २. गुणात्मक | | |
| २.१ | बातमी / लेखामध्ये सुचविलेल्या सुधारणांची | | |
| | अ) कल्पकता | १० | |
| | ब) उपयोगिता | १० | |
| | क) व्यवहारिकता | ५ | |
| | एकूण | २५ | |
| २.३ | अ) त्यापैकी अंमलबजावणी संदर्भात सुचविलेल्या सुधारणापैकी कोणत्या सुधारणांची दखल घेऊन योजनेच्या अंमलबजावणीत किती व कोणत्या गावात बदल करण्यात आला, असल्यास, त्याची व्यापकता<br>(टिप :- ज्या गावांनी या सुधारणा केल्या त्याचा तपशिल व अनुषंगिक माहिती लेखासोबत दिलेली असेल त्या आधारे गुण देण्यात यावेत.) | १० | |
| | ब) बातमी / लेखामध्ये सुचविलेल्या धोरणात्मक सुधारणांपैकी किती सुधारणांची दखल घेऊन शासनाकडून धोरणात करण्यात आल्या असल्यास, त्याचा तपशिल.<br>(टिप :- ज्या गावांनी या सुधारणा केल्या त्याचा तपशिल व अनुषंगिक माहिती लेखासोबत दिलेली असेल त्या आधारे गुण देण्यात यावेत.) | १० | |
| | क) या बातमीचा/ फोटोफिचर्सचा / लेखाचा /लेखमाला/ अग्रलेखाचा जनमानसावरील परिणाम/ प्रभाव (वाचकांची पत्रे, अभिप्राय इत्यादीवरुन) | १० | |
| | ड) संबंधित पत्रकाराने जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी व्यापक स्वरुपात व्हावी म्हणून प्रत्यक्ष कृतीपूर्ण पध्दतीने बजावलेली सकारात्मक भूमीका | ५ | |
| | एकूण | ६० | |
| | एकूण सर्व | १०० + जादा गुण | |

४. **इलेक्ट्रॉनिक मीडियातील** पत्रकारांकरिता उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कारासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धेच्या अटी व शर्त्ती पुढीलप्रमाणे राहतील.

१. ही स्पर्धा मराठी भाषेतील वृत्तकथेसाठी आहे.

**२.** या स्पर्धेत दूरदर्शन, खासगी चित्रवाहिन्या, स्थानिक केबल न्यूज व शासकीय उपक्रम यांना सहभाग घेता येईल.

**३.** वृत्तकथाचित्र हे स्पर्धेच्या संबंधित वर्षात तयार केलेले व प्रसारित झालेले असावे आणि वृत्तकथा किमान ३ पेक्षा जास्त मिनिटांची असावी.

**४.** प्रवेशिका पाठविताना संबंधित प्रतिनिधीची माहिती तसेच वृत्तकथा कोणत्या दिवशी प्रसारित झाली याबाबत संबंधित संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र असावे.

५. स्थानिक केबलच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांचे नोंदणीपत्र सादर करणे आवश्यक राहील. प्रवेशिकेसोबत संबंधित वृत्तकथेची डिजिटल/बिट कॅसेट थेट निवड समितीकडे सादर करावी.

६. मराठी वृत्तचित्रकथा राज्यस्तरीय पुरस्कारासाठी थेट प्राप्त झालेल्या नावांमधून पुरस्कार प्राप्त विजेत्यांची निवड करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मिडियातील तज्ञ व्यक्तींची परिक्षण समितीवर नियुक्ती करण्यात येईल.

७. इलेक्ट्रॉनिक मिडियातील पत्रकारांची निवड राज्यस्तरावरील समिती करेल.

## ५) निकष व द्यावयाचे गुण (इलेक्ट्रॉनिक मीडिया)

| अ.क्र. | तपशील | कमाल गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| | १) संख्यात्मक | | |
| १.१ | संबंधित अर्जदाराने अभियान कालावधी (दिनांक १ जानेवारी, ते ३१ डिसेंबर,२०१५) एकुण प्रसिध्द केलेल्या वृत्तकथा यांची संख्या | १५ | |
| १.२ | एकूण प्रसिध्द केलेल्या वृत्तकथा संख्या | २५ | |
| | २. गुणात्मक | | |
| २.१ | वृत्तचित्रकथा सुचविलेल्या सुधारणांची | | |
| | अ)कल्पकता | १० | |
| | ब) उपयोगिता | १० | |
| | क) व्यवहारिकता | ५ | |
| २.३ | अ) त्यापैकी अंमलबजावणी संदर्भात सुचविलेल्या सुधारणापैकी कोणत्या सुधारणांची दखल घेऊन योजनेच्या अंमलबजावणीत किती व कोणत्या गावात बदल करण्यात आला, असल्यास, त्याची व्यापकता<br>(टिप :- ज्या गावांनी या सुधारणा केल्या त्याचा तपशिल व अनुषंगिक माहिती सोबत दिलेली असेल त्या आधारे गुण देण्यात यावेत.) | १० | |
| | ब) वृत्तकथेमध्ये सुचविलेल्या धोरणात्मक सुधारणांपैकी किती सुधारणांची दखल घेऊन शासनाकडून धोरणात करण्यात आल्या असल्यास, त्याचा तपशिल.<br>(टिप :- ज्या गावांनी या सुधारणा केल्या त्याचा तपशिल व अनुषंगिक माहिती सोबत दिलेली असेल त्या आधारे गुण देण्यात यावेत.) | १० | |
| | क) या वृत्तचित्रकथेचा जनमानसावरील परिणाम/ प्रभाव (वाचकांची पत्रे, अभिप्राय इत्यादीवरुन) | १० | |
| | ड) संबंधित पत्रकाराने जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी व्यापक स्वरुपात व्हावी म्हणून प्रत्यक्ष कृतीपूर्ण पध्दतीने बजावलेली सकारात्मक भूमीका | ५ | |
| | एकूण सर्व | १०० | |

## शासन निर्णय क्रमांक मफुअ-२०१५/प्र.क्र.३७/जल-८ दि. २८/०९/२०१६

## परिशिष्ट - ब

## जलयुक्त शिवार अभियान

## प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार देण्याबाबत.

पूर्ण नांव :-------------------

पत्ता :----------------------

दिनांक :--------------------

### उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार सन

प्रति,

सदस्य सचिव,

जिल्हास्तरीय समिती / विभागीयस्तर समिती / राज्यस्तर समिती,

................................................

महोदय,

महाराष्ट्र शासनातर्फे इलेक्ट्रॉनिक मीडियाला देण्यात येणाऱ्या **उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारच्या अटी व नियम मी वाचले असून त्यास अनुसरुन** राज्य पुरस्कारासाठी प्रवेशिका सादर करीत आहे.

१. **पूर्ण नाव :**

२. **पत्ता :**

३. **जन्मतारीख :**

४. **लिखाण प्रसिध्द झालेल्या वृत्तपत्राचे नाव :**

५. **पत्रकारितेतील अनुभवाचा कालावधी :**

६. **मागील** पाच वर्षात विकासविषयक पत्रकारिता केलेल्या कामगिरीचा सविस्तर तपशील : (स्वतंत्र कागदावर माहिती देता येईल)

७. **शासनाच्या** विकास विषयक कामाच्या प्रसिध्दीसाठी, जाणीव जागृतीसाठी केलेले विशेष प्रयत्न : (स्वतंत्र कागदावर माहिती देता येईल)

८. १ जानेवारी, ते ३१ डिसेंबर, या वर्षातील त्यांची कामगिरी / वृत्तमालिका / शासनाच्या विविध लोकोपयोगी योजनांवर आधारित लेख / लाभार्थींच्या मुलाखती / यशकथा / यशोगाथा / लेख / दुरदर्शन / आकाशवाणीवरील कार्यक्रम (आकाशवाणी/दूरदर्शनवरील कार्यक्रमाबाबत पुरावे जोडावे) यांची मूळ कात्रणे व त्यांच्या दोन प्रती प्रवेशिकेच्या सोबत जोडले आहेत.

९. **पुरस्कार** स्विकारण्याबाबत संमतीपत्रक सोबत जोडले आहे.

१०. **आवश्यक** वाटल्यास अन्य माहिती (स्वतंत्र कागदावर द्यावी.)

११. **पत्रकारिता** हा माझा पूर्ण वेळ व्यवसाय असून अन्य कोणतीही नोकरी मी करीत नाही, असे प्रमाणित करीत आहे. तरी कृपया या प्रवेशिकेचा विचार व्हावा, ही विनंती.

ठिकाण : आपला / आपली,

दिनांक : ( नाव / स्वाक्षरी )

पूर्ण नांव :--------------------

पत्ता :------------------------

दिनांक :----------------------

## उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार

प्रति,

मा.सदस्य सचिव (राज्यस्तर)

महोदय,

महाराष्ट्र शासनातर्फे इलेक्ट्रॉनिक मीडियाला देण्यात येणाऱ्या **उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कारच्या अटी व नियम मी वाचले असून त्यास अनुसरुन** राज्य पुरस्कारासाठी प्रवेशिका सादर करीत आहे.

१. **पूर्ण नाव :**
२. **पत्ता :**
३. **जन्मतारीख :**
४. **वृत्तकथाचित्र प्रसिध्द झालेल्या वृत्तवाहिनीचे नाव :**
५. **इलेक्ट्रॉनिक मीडियातील अनुभवाचा कालावधी :**
६. **मागील** पाच वर्षात विकासविषयक इलेक्ट्रॉनिक मीडिया क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा सविस्तर तपशील : (स्वतंत्र कागदावर माहिती देता येईल)
७. **शासनाच्या** विकास विषयक कामाच्या प्रसिध्दीसाठी, जाणीव जागृतीसाठी केलेल्या विशेष प्रयत्नांची माहिती : (स्वतंत्र कागदावर माहिती देता येईल)
८. १ जानेवारी, ते ३१ डिसेंबर, या वर्षातील त्यांची कामगिरी / वृत्तमालिका / शासनाच्या विविध लोकोपयोगी योजनांवर आधारित लाभार्थींच्या मुलाखती / यशकथा / यशोगाथा व इतर वृत्तवाहिनींवरील कार्यक्रम, या कार्यक्रमांचे डिजिटल / बिटा कॅसेट पुरावा म्हणून सोबत जोडणे आवश्यक आहे.)
९. **पुरस्कार** स्विकारण्याबाबत संमतीपत्र सोबत जोडले आहे.
१०. **आवश्यक** वाटल्यास अन्य माहिती (स्वतंत्र कागदावर द्यावी.)
११. **पत्रकारितेखेरीज** अन्य कोणतीही नोकरी मी करीत नसल्याचे प्रमाणित करीत आहे.

तरी कृपया या प्रवेशिकेचा विचार व्हावा, ही विनंती.

ठिकाण : आपला / आपली,

दिनांक : ( नाव / स्वाक्षरी )